23 JUL 2024

## आजीव सेवकासाठी नियम

१) सर्व प्रकारच्या व्यसनापासून मुक्त असलेली व्यक्ति आजीव सेवक म्हणून निवड होण्यास पात्र राहील.

२) सत्य,चारित्र्य,प्रामाणिकपणा,पिळवणूक प्रवृत्तीस आळा,त्याग व सेवा ही मुल्ये आत्मसात केलेला व त्याची जोपासना करणारा असला पाहिजे.

३) आपल्या स्वतःच्या विचार उच्चार,बंधुभाव व आचार शुध्दतेवर त्याचा भर राहील.

४) आत्मसमर्पण,राष्ट्रीयप्रवृत्ती,समता व बंधुभाव हे गुण आत्मसात करण्यात ते सज्ञ असतील.

५) मान्य विद्यापीठाच्या किमान दोन पदव्या धारण करणारे पदवीधर ते असले पाहिजेत किंवा एक पदवी शासनाने मान्य केलेला डिप्लोमा झालेला असला पाहिजे आणि संस्थेमध्ये सलग दहा किंवा त्याहून अधिक वर्षे नोकरी ज्यांनी केली आहे अशा संस्थेच्या सेवेत निष्ठेने काम करणारा शाखा प्रमुख (मुख्याध्यापक/प्राचार्य) कार्यकर्ता आजीव सेवक होण्यास पात्र असेल.

६) आजीव सेवकांकडून सचोटीची,प्रामाणिकपणाची व मन लावून संस्थेसाठी संस्थेच्या अडचणींच्या ठिकाणी काम करण्याची अपेक्षा आहे. त्यांनी पूर्णवेळ संस्थेच्या सेवेत रहावे,संस्थेची आजन्म सेवा करण्याची तयारी पाहिजे.

७) आजीव सेवकांची निवड ही दोन वर्षाकरिता हंगामी व त्यानंतर त्याची निवड कायम करण्याचा विचार केला जाईल.

८) संस्थेत दहा वर्षे कायम सेवा झालेल्या व एकनिष्ठ राहून संस्थेसाठी भरीव कार्य केलेल्या सेवकांची आजीव सेवकत्वासाठी आजीव सेवक मंडळाने एक यादी तयार केली आहे या यादीतील सेवकांनाच आजीव सेवकासाठी अर्ज करता येतील सदर यादी जाहीर केली आहे.

९) आजीव सेवकाची निवड आजीव सेवक समिती २/३ बहुमताने करेल.

१०) नवीन आजीव सेवक करताना ८ मध्ये नमुद केलेल्या यादीतील सेवाजेष्ठतेचा विचार केला जाईल.

कळावे,

सेक्रेटरी,
श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,
कोल्हापूर